आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

३ जुलै २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- संसदेचं पावसाळी अधिवेशन संस्थगित /भारताची राज्यघटना प्रत्येक सरकारसाठी दीपस्तंभासारखीच मार्गदर्शक असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं राज्यसभेत प्रतिपादन
- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांची अडवणूक न करण्याचे मुख्यमंत्र्यांचे प्रशासनाला निर्देश
- महाराष्ट्रात झिका विषाणूंचा संसर्ग झालेले रुग्ण आढळल्यानंतर केंद्रीय आरोग्य मंत्रालयाकडून सर्व राज्यांना मार्गदर्शक नियमावली जारी

**आणि**

- पहिल्यांदाच ८० हजारांच्या पार गेलेला मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स दिवसअखेर ५४५ अंकांची वाढ नोंदवत ७९ हजार ९८७ अंकांवर बंद

**<><><><><>**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनात राज्यसभेचं कामकाज आज अनिश्चित काळासाठी तहकूब करण्यात आलं. लोकसभेचं कामकाज कालच संस्थगित करण्यात आलं होतं. त्यामुळे संसदेचं पावसाळी अधिवेशन संस्थगित झालं आहे.

तत्पूर्वी राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दल आभारप्रस्तावावर राज्यसभेत झालेल्या चर्चेला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज उत्तर दिलं. भारताची राज्यघटना ही प्रत्येक सरकारसाठी दीपस्तंभासारखीच मार्गदर्शक असल्याचं प्रतिपादन त्यांनी यावेळी केलं. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या राज्यघटनेमुळेच राजकीय वारसा नसलेल्या व्यक्तीला राजकारणात येण्याची आणि इतक्या मोठ्या पदावर पोहचण्याची संधी मिळाली, असंही ते म्हणाले. काँग्रेस हा संविधानाचा सर्वात मोठा शत्रू असून त्यांची मानसिकता एससी, एसटी आणि ओबीसींना विरोध करण्याची आहे, अशी टीकाही नरेंद्र मोदी यांनी केली.

प्रधानमंत्र्यांचं भाषण सुरू असतानाच, विरोधकांनी गदारोळ करत सभात्याग केला. विरोधकांकडे प्रश्नांची उत्तरं ऐकण्याचं धाडस नसल्यानं त्यांनी सभात्याग करत सभागृहाचा अपमान केल्याचं मोदी यावेळी म्हणाले.

<><><><><>

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी आवश्यक कागदपत्रं देणं, अर्ज भरून देणं यासाठी महिलांची अडवणूक केली तर कठोर कारवाई केली जाईल, अशी सक्त ताकीद मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. ही प्रक्रिया पारदर्शकपणे आणि जलदगतीने व्हावी यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना लक्ष ठेवण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत. तसंच योजनेचं संनियंत्रण करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याचे निर्देशही त्यांनी दिले आहेत. या योजनेसाठी अर्ज करण्याची मुदत ३१ जुलैपर्यंत वाढवण्यात आली आहे.

<><><><><>

महाराष्ट्रात काही ठिकाणी झिका विषाणूंचा संसर्ग झालेले रुग्ण आढळल्यानंतर केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालयानं सर्व राज्यांना मार्गदर्शक नियमावली जारी केली आहे. महाराष्ट्रात २ जुलैपर्यंत पुण्यात सहा तर कोल्हापूर आणि संगमनेर इथं प्रत्येकी एक अशा एकूण  आठ झिकासंक्रमित रुग्णांची नोंद झाली आहे.

या पार्श्वभूमीवर सर्व राज्यांनी झिका विषाणू संसर्गासंदर्भात अधिक दक्षता बाळगावी असे निर्देश मंत्रालयानं दिले आहेत. विशेषतः झिका संक्रमित  गर्भवती मातांची तपासणी आणि  गर्भाच्या वाढीवर देखरेख ठेवावी  आणि केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार काम करावं असं यात म्हटलं आहे. हा आजार संक्रमित एडीस प्रजातीचा डास चावल्यानं  होत असल्यानं आरोग्य सुविधा केंद्र आणि रुग्णालयांनी  त्यादृष्टीनं देखरेख ठेवत आपला परिसर एडीस डासापासून मुक्त

ठेवण्यासाठी एका नोडल अधिकाऱ्याला तैनात करावं, असे निर्देश देखील राज्यांना दिले आहेत.

निवासी वस्त्या, कार्यालयं, संस्था, बांधकाम सुरु असलेली ठिकाणं, शाळा, महाविद्यालयं आणि आरोग्य सुविधा केंद्रांमध्ये  कीटकांची उत्पत्ती होणार नाही याची दक्षता घ्यावी आणि रोगवाहक सूक्ष्मजीव प्रतिबंधक उपक्रम अधिक प्रमाणात राबवावेत यावरही मंत्रालयानं  भर दिला आहे.

**<><><><><>**

पाणीटंचाई असणाऱ्या शहरात विकासकाला पर्यायी पाण्याची सोय करण्याच्या, हे खरेदीदाराला करारपत्रात लिहून देण्याच्या आणि हे ‘रेरा’ला कळवण्याच्या सूचना नगरविकास विभागामार्फत दिल्या जातील, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानसभेत दिली. पाणी वितरण व्यवस्था नव्यानं तयार करून, पाण्याचा पुनर्वापर करण्यावर भर दिला जात असल्याचं त्यांनी सांगितलं.

भुशी धरणात पाच जण वाहून गेल्याची घटना दुर्दैवी असून भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी राज्यातल्या सर्व जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश दिल्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितलं. भुशी धऱणात मरण पावलेल्यांच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून प्रत्येकी पाच लाख रुपये देण्याची घोषणाही त्यांनी केली.

राज्यातल्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन  त्यांना दोन हेक्टरच्या मर्यादेत प्रती हेक्टरी पाच हजार रुपये मदत देण्याची घोषणा पणन मंत्री अब्दुल सत्तार यांनी आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात केली. यावर्षी लांब धाग्याच्या कापसाची सरकारी खरेदी, केंद्र सरकारनं नमूद केलेल्या नव्या दरानं होईल, असं त्यांनी सांगितलं.

राज्यातल्या सर्व विद्यार्थ्यांना प्रत्येकी दोन गणवेश मोफत देण्याचा निर्णय घेतला असल्याची घोषणा शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी आज विधानसभेत केली. ३० जुलैपर्यंत सर्व शाळांमध्ये गणवेश पोहोचतील, असं ते म्हणाले.

मुंबईतल्या अपुऱ्या पाणी पुरवठ्यावर चर्चा करण्यासाठी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी येत्या शुक्रवारी आपल्या दालनात बैठक बोलावली आहे. आमदार आशीष शेलार यांनी आज विधानसभेत याबद्दल तक्रार मांडली होती.

महाराष्ट्र सेवा हमी योजनेचा आढावा मुख्यमंत्री घेतील, तसंच वेळेत काम न करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांच्यावर कारवाई केली जाईल, अशी माहिती प्रभारी मंत्री शंभुराज देसाई यांनी विधानसभेत दिली.

पारंपरिक पद्धतीने मच्छीमारी करणाऱ्या मच्छीमारांना संरक्षण देण्यासाठी पर्ससीन आणि एलईडी मासेमारी करणाऱ्यांवर आर्थिक दंडासह गुन्हा दाखल केला जाईल, असं मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राज्यपालांच्या अभिभाषणाच्या आभाराचा प्रस्ताव आज विधानपरिषदेनं एकमताने मंजूर केला. तत्पूर्वी, या प्रस्तावावर झालेल्या चर्चेला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी उत्तर दिलं. राज्याची अर्थव्यवस्था वेगानं वाढत असून गुंतवणुकीच्या बाबतीतही राज्य अग्रेसर आहे. राज्याच्या अर्थव्यवस्थेनं अर्धा ट्रिलियन डॉलरचा टप्पा पार केला आहे आणि एक ट्रिलियन डॉलरचं ध्येय पुढच्या ३ ते ५ वर्षांत गाठण्याच्या दृष्टीनं मार्गदर्शक आराखडा तयार असल्याचं त्यांनी सांगितलं.

महायुती सरकारनं नोकरभरतीची प्रक्रिया पारदर्शक पद्धतीनं राबवत सव्वा दोन वर्षांत एक लाख लोकांना सरकारी नोकरी देण्याचा विक्रम केल्याचं सांगून, या

भरतीसाठी घेतलेल्या परीक्षांमध्ये पेपरफुटीचा एकही गुन्हा नोंदवला गेलेला नाही, असं फडनवीस यांनी सांगितलं.

वाढवण बंदर महाराष्ट्राच्या विकासात मोठी भूमिका बजावेल, ते तयार करताना मासेमार आणि स्थानिकांचं कोणतंही नुकसान होणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. त्यानंतर या प्रस्तावावर मतदान घेण्यात आलं आणि आवाजी मतदानाने एकमताने प्रस्ताव मंजूर करण्यात आला. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ एका घरातल्या जास्तीत जास्त दोनच महिलांना घेता येईल, असं त्यांनी स्पष्ट केलं.

पटसंख्या कमी असलेल्या शाळा बंद करण्याचा सरकारचा कोणताही हेतू नाही, अशी ग्वाही मंत्री दीपक केसरकर यांनी आज विधानपरिषदेत दिली. वीस षटकांच्या विश्वचषक स्पर्धेचं जेतेपद पटकावणाऱ्या भारतीय संघाचं अभिनंदन करण्याचा प्रस्ताव सभागृहानं एकमतानं मंजूर केला.

**<><><><><>**

सभागृहात आक्षेपार्ह शब्द वापरल्याबद्दल निलंबित झालेले विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी दिलगिरी व्यक्त केली आहे. आपल्या निलंबनाचा फेरविचार करावा अशी विनंतीही त्यांनी उपसभापती नीलम गोऱ्हे यांना पत्राद्वारे केली आहे. दानवे यांच्या निलंबनाचा फेरविचार करण्याची मागणी, अनिल परब यांनी  सभागृहात प्रश्नोत्तराच्या तासात केली. त्यावर प्रश्नोत्तराच्या तासानंतर चर्चा करून याबाबतचा निर्णय घेऊ, असं गोऱ्हे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राज्य सरकारकडून सर्व वारकऱ्यांचा विमा काढला जाईल. तसंच वारीतल्या वाहनांना येत्या २१ जुलैपर्यंत टोलमाफी केली जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज केली. विधीमंडळाच्या आवारात आज ते वार्ताहरांशी बोलत होते.

**<><><><><>**

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्सनं आज व्यवहारादरम्यान ८० हजार अंकांची महत्त्वपूर्ण पातळी २ वेळा ओलांडली. पहिल्यांदाच ८० हजारांच्या पार गेलेला सेन्सेक्स दिवसअखेर ८० हजारांच्या पातळीवर बंद होऊ शकला नाही.

दिवसअखेर सेन्सेक्स ५४५ अंकांची वाढ नोंदवून ७९ हजार ९८७ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीनंही आज नवा उच्चांक नोंदवला आणि २४ हजार ३०० ची पातळी ओलांडली. दिवसअखेर निफ्टी १६३ अंकांची वाढ नोंदवत २४ हजार २८७ अंकांवर बंद झाला. बँक निफ्टी आज पहिल्यांदाच ५३ हजारांच्या पलीकडे जाऊन स्थिरावला.

**<><><><><>**

नांदेड जिल्ह्यात किनवट इथं आज नीती आयोगाच्या आकांक्षीत तालुका कार्यक्रमांतर्गत जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या हस्ते संपूर्णता अभियानाचा प्रारंभ करण्यात आला. आकांक्षी तालुका कार्यक्रमांतर्गत सर्व निकष ऑगस्टअखेर पूर्ण केले जातील, असं जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी यावेळी सांगितलं.

धाराशिव जिल्ह्यातल्या परंडा तालुक्यातही जुलै, ऑगस्ट, आणि सप्टेंबर या तीन महिन्यात संपूर्णता अभियान राबवलं जाणार आहे त्याचं उद्धाटन उद्या परंडा येथे होत आहे या अभियानाविषयी धाराशिवचे जिल्हाधिकारी डॉक्टर सचिन ओंबासे यांनी सांगितलं…

**होल्ड- बाईट - सचिन ओंबासे**

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असून कोकण किनारपट्टीवर सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. याच

काळात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह मुसळधार पाऊस पडेल, असा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

//<><><><><>//